||सिध्दिरनेकान्तात||

Estd-June 1962

Anekant Education Society's

# TULJARAM CHATURCHAND COLLEGE

**of Arts, Science and Commerce, Baramati, 413102**

Autonomous

Religious Minority Institute

NAAC Reaccredited 'A+', CGPA 3.55

Email : principal@tccollege.org, principal.tccollege@gmail.com

Website : www.tccollege.org

☎ : (02112) 222405, 223635 Fax : (02112) 222728

## College Development Committee Minutes of Meeting [Date – 18/02/2022]

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ कलम ९७ (१) अन्वये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामतीसाठी प्रस्थापित महाविद्यालय विकास समितीची सभा शुक्रवार, दि. १८/०२/२०२२ रोजी सायं. ५.०० वा. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) यांचे अध्यक्षतेखाली संस्था सभागृहात सुरु झाली.

हजर सभासद –

०१) मा. श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) अध्यक्ष
०२) मा. श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर) सचिव
०३) मा. श्री. विकास शहा (लेंगरेकर)
०४) मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर पदसिध्द सदस्य
०५) मा. डॉ. हनुमंत फाटक, सदस्य
०६) मा. डॉ. मिलिंद गजभिए, सदस्य
०७) मा. डॉ. जनार्दन पवार, सदस्य
०८) मा. डॉ. सीमा नाईक-गोसावी, सदस्य
०९) मा. डॉ. योगिनी मुळे, सदस्य
१०) मा. श्री. प्रशांत राऊत, सदस्य
११) मा. श्री. अमोल पाटील, सदस्य
१२) मा. डॉ. अविनाश जगताप, निमंत्रित सदस्य
१३) मा. डॉ. रामचंद्र सपकाळ, निमंत्रित सदस्य
१४) मा. प्रा. उपेंद्र चौधरी, निमंत्रित सदस्य
१५) मा. श्री. अभिनंदन शहा, निमंत्रित सदस्य
१६) मा. सौ. सुषमा संगई, निमंत्रित सदस्य

मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

प्रथमतः आपल्या अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य मा. श्री. राजकुमार शाह (वाघोलीकर) यांचे दि. ०५ डिसेंबर, २०२१ रोजी वृध्दापकाळामुळे दुःखद निधन झाले. स्व. श्री. राजकुमार शाह (वाघोलीकर) यांना ही सभा श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

तसेच आपल्या महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवक श्री. संतोष गायकवाड यांचे आकस्मिक निधन झाले. स्व. श्री. संतोष गायकवाड यांना ही सभा श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

यानंतर आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांना पुरस्कार प्राप्त झाले त्याबद्दल खालीलप्रमाणे अभिनंदनाचे ठराव घेण्यात आले.

१) महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रीय सेवा योजना कार्याबद्दल आपल्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय सन २०२०-२१ साठीचा सर्वोत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार व सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी प्रा. विलास कर्डीले यांना जाहीर झाला आहे. तसेच गणेश दडस यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त झाला आहे.
२) आपल्या महाविद्यालयाच्या मायक्रोबायॉलॉजी च्या विद्यार्थी स्वदीप भोसले यास मायक्रोबायॉलॉजी सोसायटी ऑफ इंडियाकडून बेस्ट स्टूडंट अॅवॉर्ड प्राप्त झाला.
३) डॉ. जनार्दन पवार यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अॅस्पायर रिसर्च मेंटॉरशिप ग्रँट मंजूर.
४) आपल्या महाविद्यालयास ARIIA Ranking 2021 मध्ये बढती मिळून जनरल नॉन टेक्नीकल कॅटेगरी मध्ये ब्रँड परफॉर्मर म्हणून ग्रेड मिळली आहे.
५) डॉ. रामचंद्र सपकाळ - नॅनो मॉलीक्युलर सोसायटी, महाराष्ट्र राज्य डायरेक्टर १ वर्षाकरिता पुनर्नियुक्ती
६) डॉ. शिवाजी पवार, सीआयआरआर. प्रमुख यांना ऑस्ट्रेलियन पेटंट प्राप्त झाले आहे
७) प्रा. विनायक लष्कर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सामाजिक कार्याकरिता दिला जाणारा 'युवा गौरव पुरस्कार' विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह देऊन प्रदान करण्यात आला.
८) डॉ. गौतम जाधव यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून 'उत्कृष्ठ शारिरीक संचालक पुरस्कार' प्रदान.
९) आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचा विद्यार्थी सिनियर अंडर ऑफिसर ओंकार बाघोले याची दिल्ली येथील आर. डी. सी. कॅम्पसाठी निवड झाली होती. या परेडमध्ये सहभागी होत त्याने पंतप्रधान रॅलीमध्येही सहभाग नोंदवला.
१०) आपल्या महाविद्यालयातील प्रा. दीपाली अनपट, बीबीए प्रमुख यांची महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर या उपक्रमांतर्गत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी पुणे ग्रामीण तालुका बारामती विभागासाठी तालुका समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे.
११) बारामती नगरपरिषदेतर्फे मा. प्राचार्यांसह २० जणांना हरितमित्र / पर्यावरणदूत पुरस्काराने सन्मानित केले. आपल्या महाविद्यालयामध्ये नव्याने मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र या विभागांना रिसर्च सेंटर मान्यता मिळाली आहे.

सभेने सर्वांचे अभिनंदन केले.

वरिष्ठ वेतनश्रेणी (CAS) –

आपल्या महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांचे वरिष्ठ वेतनश्रेणी शिबीर दि. ५ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित केले होते. यामध्ये आपल्या महाविद्यालयातील ३५ प्राध्यापकांपैकी १२ प्रोफेसर, ३ असोशिएट प्रोफेसर, २२ असिस्टंट प्रोफेसर यांची वेतनश्रेणी निश्चीत ~~म्हणून~~ होऊन त्याप्रमाणे पदोन्नती करण्यात आली.

नवीन अभ्यासक्रम –

१) मराठी, इंग्रजी, अर्थशास्त्र या विषयाकरिता पीएच.डी. सेंटर्सना शै. वर्ष २०२१-२२ पासून मान्यता मिळाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पेट / सेट युजीसी नेट परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. करिता दि. २७ जानेवारी व ३१ जानेवारी २०२२ रोजी मुलाखती (कागदपत्रे तपासणी) आयोजित केल्या होत्या. एकुण ५३ विद्यार्थ्यांची याकरिता निवड करण्यात येऊन रिक्त जागांप्रमाणे गाईड अॅलॉट करण्यात आले. एकूण संशोधनाकडे विद्यार्थ्यांचा वाढलेला कल पाहता आणि गरज पाहता आपल्या महाविद्यालयामध्ये आपण प्लाजॅरिझम सॉफ्टवेअर घेतले असून विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये प्लाजॅरिझम ची सुविधा देत आहोत.

२. नव्याने कॉमर्स, हिंदी, स्टॅटिस्टिक्स या विषयाकरिता रिसर्च सेंटर्सना मंजूरी साठी प्रस्ताव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे पाठविला आहे.

करार -

१) Rajiv Electronics Pune, (Electronics Dept.)
२) Future Chip Technologies, Pune (Electronics Dept.)
३) D. Y. Patil Medical College, Kolhapur
४) AIS Solutions Pvt. Ltd., Pune (Statistics)
५) AIS Solutions Pvt. Ltd., Pune (BBA CA)
६) Eagle Solution, Talwade, Pune (Electronics Dept.)
७) AIS Adventures, Pune (Electronics Dept.)
८) Q Edges Consultancy Services, Pune (Micro. Dept.)
९) Mangalam Agrotech, Manchar

आयोजित केले गेलेले उपक्रम -

१) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वर्षभर विविध उपक्रम राबविले गेले.
२) ऑटोनॉमस अंतर्गत विविध सभांचे आयोजन उदा. करिअर कट्टा, समानसंधी कक्ष, स्कील हब इनिशिएटिव्हची स्थापना.
३) दि. १८ ते १९ मे, २०२१ या कालावधीत डिझायनिंग ऑफ मल्टीपल चॉईस क्वेश्चन्स हा वर्कशॉप आयोजित केला गेला.
४) रुसा, मुंबई यांचेकडून दि. २१ मे २०२१ रोजी रुसा सॉफ्टवेअर वर्कशॉप आयोजित केला होता.
५) आय.क्यू.ए.सी. मिटिंग्ज दि. २१ ऑगस्ट २०२१ ते दि. ०३ डिसेंबर २०२१ रोजी आयोजित केल्या गेल्या.
६) सर्व विभागांचे ऑनलाईन प्रेझेंटेशन दि. १६ जून ते १९ जून २०२१ रोजी घेण्यात आले.
७. दि. ३१ ऑगस्ट २०२१ रोजी शै. वर्ष २०१९-२० चा ए.क्यू.ए.आर. अपलोड केला.
८. सर्व विभागांचे अंतर्गत परीक्षण दि. १७ ते दि. २० सप्टें. २०२१ रोजी आयोजित केले गेले.
९. पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ब्रीज कोर्स क्लासेस आयोजित केले गेले.
१०. सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकरिता हेल्थ अवेरनेस प्रोग्राम आयोजित केला गेला.
११. शै. वर्ष २०२१-२२ चा एमआयएस रिपोर्ट सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सादर.
१२. एनआयआरएफ रिपोर्ट सादर केला.
~~१३~~

प्रस्तावित विशेष उपक्रम -

१. आपल्या महाविद्यालयामध्ये दि. १४ ते १८ मार्च २०२२ रोजी ऑल इंडिया इंटर बेसबॉल चॅम्पियनशीप आयोजित केल्या असून यामध्ये ४५ विद्यापीठांच्या टीम सहभागी होणार आहेत.
२. दि. २० ते २४ मार्च, २०२२ मध्ये ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल चॅम्पियनशीप आयोजित केल्या असून विद्यापीठांच्या टीम यामध्ये सहभागी होणार आहेत.
३. बोर्ड ऑफ स्टडीज, ॲकॅडेमिक कौन्सिल फायनान्स कमिटी, गव्हर्निंग कौन्सीलची पुनर्रचना
४. विद्यापीठाकडून प्राप्त योजनांची अंमलबजावणी
५. बारामती नगरपरिषदेच्या स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग
६. दि. ०९ व १० मार्च २०२२ रोजी राष्ट्रीय स्तरावर महिला परिषद आयोजित केली आहे.
७. बलाई ॲकॅडेमी, पाचगणी यांचे आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचेकरिता विविध वर्कशॉप्स आयोजित केले गेले आहेत.

वसतीगृह -

१) दुसऱ्या सत्रात मुलींचे वसतिगृह सुरु करण्यात आले. एकुण ५२० मुलींची सध्या होस्टेलमध्ये रहात आहेत.

२) मुलांच्या वसतीगृहाची नवीन इमारत बांधून तयार आहे. १०० खोल्या असून ३०० विद्यार्थ्यांची पुढील शैक्षणिक वर्षापासून मुलांना राहण्याची सोय होईल.

* यानंतर सभेपुढील मुख्य विषयांवर चर्चा व विचारविनिमय करण्यात आला.

<u>विषय क्र. १ -</u>
मागील सभेचे कार्यवृत्त वाचून मंजूर करणे.

<u>ठराव नं. १ -</u>
मागील सभा दि. ०८/०९/२०२१ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून मंजूर करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

<u>विषय क्र. २ -</u>
आर्थिक वर्ष २०२१-२२ ची सुधारित अंदाजपत्रके आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या अंदाजपत्रकांवर चर्चा करून व्यवस्थापनाकडे मंजूरीसाठी शिफारस करणे.

<u>ठराव नं. २ -</u>
आर्थिक वर्ष २०२१-२२ ची सुधारित अंदाजपत्रके ~~आणि आर्थिक वर्ष~~ रक्कम रु. २२,९३,३३,९०७/- आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ या वर्षाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ३८,४४,७८,६५३/- मा. रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा यांनी सभेपुढे पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे सविस्तर सादर केले. यामध्ये स्वायत्त परीक्षा विभागाचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार केले आहे. २०२२-२३ मध्ये फी मध्ये १० टक्के वाढ केली आहे. महाविद्यालयास समाजकल्याण कडून रक्कम येणे बाकी असल्याचे मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले.

अंदाजपत्रकाचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | खाते | सुधारित अंदाजपत्रक २०२१-२२ | अंदाजपत्रक २०२२-२३ |
|---|---|---|---|
| ०१. | वरिष्ठ महाविद्यालय वेतन व वेतनेतर खाते स्वायत्त अनुदानित | १६,५०,१४,९०१/- | १६,२५,१००२८/- |
| ०२. | वरिष्ठ विनाअनुदानित अभ्यासक्रम | ७,४८,५९,५६८/- | १०,१७,३०,०००/- |
| ०३. | परिक्षा विभाग | १,२१,५५,९०२/- | १,५१,७७,७७६/- |
| ०४. | वरिष्ठ महाविद्यालय अनुदानित व विनाअनुदानित<br>* तूट - ८,१४,६१,४४४/-<br>* येणे - ३,११,८४,०००/-<br>(समाजकल्याण विभाग यांचेकडून) | २२,९३,३३,९०७/- | ३८,४४,७८,६५३/- |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय -
शै. वर्ष २०२०-२१ या वर्षाचा ए.क्यू.ए.आर. नॅकच्या साईटला अपलोड करणेस मान्यता देणे.

ठराव नं. ३ -
शै. वर्ष २०२०-२१ या वर्षाचा ए.क्यू.ए.आर. नॅकच्या साईटला अपलोड करणेस ही सभा आपली मान्यता देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय विचारार्थ नसल्याने डॉ. मिलिंद गजभिये यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे संमतीने सभा संपल्याचे घोषित केले.

सचिव प्राचार्य

चेअरमन

# College Development Committee Minutes of Meeting [Date – 08/09/2021]

... कायदा २०१६ कलम (९७ (१)) अन्वये तुकाराम चतुरचंद महाविद्यालयासाठी प्रस्थापित महाविद्यालय विकास समितीची सभा बुधवार, दि. ०८/०९/२०२१ रोजी सायं. ०४:३० वा. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली.

हजर सभासद –

१) मा. श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) अध्यक्ष
२) मा. श्री. मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर) सदस्य
३) मा. श्री. विकास शशिकांत शहा (लेंगरेकर) सदस्य
४) मा. डॉ. चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर, सदस्य सचिव
५) मा. डॉ. हनुमंत फाटक, सदस्य
६) मा. डॉ. योगिनी मुळे, सदस्य
७) मा. डॉ. सीमा नाईक-गोसावी, सदस्य
८) मा. डॉ. जनार्दन पवार, सदस्य
९) मा. श्री. प्रशांत राऊत, सदस्य
१०) मा. श्री. अमोल पाटील, सदस्य
११) मा. प्रा. उपेंद्र चौधरी, (निमंत्रित सदस्य)
१२) मा. डॉ. अविनाश जगताप, (निमंत्रित सदस्य)
१३) मा. डॉ. अजित तेलवे, (निमंत्रित सदस्य)
१४) मा. डॉ. रामचंद्र सपकळ, (निमंत्रित सदस्य)
१५) मा. श्री. अभिनंदन शहा, (निमंत्रित सदस्य)
१६) मा. सौ. सुषमा संगई (निमंत्रित सदस्य)

मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

प्रथमतः खालीलप्रमाणे दुखवट्याचे ठराव घेण्यात आले.

आपले माजी कर्मचारी श्री. अब्दुलगणी शेख यांचे दि. ०८ एप्रिल २०२१ रोजी दुःखद निधन झाले. संख्याशास्त्र विभागाचे माजी प्रमुख व माजी प्रभारी प्राचार्य प्रा. व्ही. जी. पडवेकर यांचे दि. १२ एप्रिल २०२१ रोजी निधन झाले. आपले माजी शिक्षकेतर कर्मचारी श्री. सतिश ऐनापुरे यांचे दि. २६ एप्रिल २०२१ रोजी निधन झाले.

माजी शिक्षकेतर कर्मचारी श्री. लक्ष्मण पडळकर, सिनियर क्लार्क श्री राजेंद्र घोणे यांचे दि. १४ मे २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्याबद्दल ही सभा त्यांना श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

## अभिनंदन

१) आपल्या महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागप्रमुख लेफ्टनंट विवेक वढे यांची २६ जानेवारी २०२१ रोजी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी एनसीसीच्या सर्वोच्च शिबीरामध्ये एनसीसी बटालियन अधिकारी म्हणून निवड.
२) आपल्या महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवक सौ. सुषमा संगई यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून गुणवंत शिक्षकेतर पुरस्कार प्राप्त.
३) आपल्या महाविद्यालयातील डॉ. विलास रुईले यांना महाराष्ट्र शासन यांचेकडून एनएसएस उत्कृष्ठ कार्यक्रम अधिकारि पुरस्कार प्राप्त.
४) आपल्या महाविद्यालयास महाराष्ट्र शासन यांचेकडून सर्वोत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार प्राप्त.
५) डॉ. सुशील देशमुख यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचेकडून इंग्रजी विषयात पीएच.डी. डिग्री प्राप्त.
६) कोकरे स्वप्नील बाळासाहेब या विद्यार्थ्यास बी.लिब. सायन्स परीक्षा एप्रिल-मे २०१८ या परीक्षेमध्ये इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बेसिक्स या पेपरमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त झाल्याबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ३५ वे अखिल भारतीय ग्रंथालय परिषद १९८९ पारितोषिक जाहीर केले.
७) माने चांगुणा जगन्नाथ या विद्यार्थ्यास बी.लिब. सायन्स एप्रिल मे २०१८ या परीक्षेमध्ये इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बेसिक्स या पेपरमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त झाल्याबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ३५ वे अखिल भारतीय ग्रंथालय परिषद १९८९ पारितोषिक जाहीर केले आहे.
८) पाटील गणेश विश्वंभर या विद्यार्थ्यास बी.लिब. सायन्स एप्रिल मे २०१८ या परीक्षेमध्ये इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बेसिक्स या पेपरमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त झाल्याबद्दल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ३५ वे अखिल भारतीय ग्रंथालय परिषद १९८९ पारितोषिक जाहीर केले आहे.

९) माने मिनाक्षी पोपट या विद्यार्थिनीस एम.लिब.सायन्स एप्रिल-मे २०१८ या परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे डॉ. एम. पी. पेठे गौरव समिती पारितोषिक जाहीर केले आहे.

१०) डॉ. गौतम जाधव यांना इन्स्टीट्यूट ऑफ स्कॉलर्स या संस्थेने रिसर्च एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड २०२० देवून सन्मानित केले. तसेच या संस्थेमार्फत चालविण्यात येणारे इंटरनॅशनल जर्नल ऑफ बेसिक अ‍ॅण्ड अ‍ॅप्लाईड सायन्सेस या जर्नलचे रिव्ह्यूवर म्हणून पुरस्कृत केले.

११) डॉ. चंद्रकांत कांबळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अर्थशास्त्र विषयाकरिता पीएच.डी. रिक्गनिशन प्राप्त.

१२) डॉ. राहूल घुमाळ यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अर्थशास्त्र विषयाकरिता पीएच.डी. रिक्गनिशन प्राप्त.

१३) डॉ. सचिन गाडेकर यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून इंग्रजी विषयाकरिता एम.फिल., पीएच.डी. रिक्गनिशन प्राप्त.

१४) डॉ. समाधान पाटील यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अर्थशास्त्र विषयाकरिता एम.फिल., पीएच.डी. रिक्गनिशन प्राप्त.

१५) डॉ. प्रदीप सरवदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून हिंदी विषयाकरिता एम.फिल., पीएच.डी. रिक्गनिशन प्राप्त.

१६) डॉ. प्रतिभा जावळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ~~इंग्रजी~~ हिंदी विषयाकरिता एम.फिल., पीएच.डी. रिक्गनिशन प्राप्त.

१७) डॉ. शशांक माने यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून इंग्रजी विषयाकरिता पीएच.डी. रिक्गनिशन प्राप्त.

१८) सभेने या सर्वांचे अभिनंदन केले.

मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी कोविड-१९ च्या काळात महाविद्यालयाने केलेल्या कामकाजाचा आढावा घेतला.

विषय क्र. १ –

मागील सभेचे कार्यवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव नं. १ –

मागील सभा दि. २८/०१/२०२१ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून मंजूर करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. २ –

स्वायत्त महाविद्यालय दर्जा प्राप्त झाल्याने अभ्यासक्रमात केल्या गेलेल्या बदलाची माहिती घेणे.

ठराव नं. २ –

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालयास २०१९-२० ते २०२८-२०२९ या १० वर्षांच्या कालावधी-करिता शैक्षणिक स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. यामुळे शै. वर्ष २०१९-२० पासून या परिसरात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तसेच स्थानिक गरजेनुसार आपण अभ्यासक्रमात बदल केले आहेत. शै. वर्ष २०२१-२२ मध्ये स्वायत्ततेच्या तिसऱ्या वर्षात आपण पदार्पण केलेले असून पदवी वर्गाच्या तृतीय वर्षाच्या नवीन अभ्यासक्रमास अ‍ॅकॅडेमिक कौन्सील व गव्हर्निंग कौन्सिलने मान्यता दिली आहे. यावर्षीपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून फिलॉसॉफी व लॉजिक व संस्कृत या दोन अभ्यास मंडळावर विद्यापीठाचे प्रतिनिधी नियुक्त केलेले आहेत. त्यामुळे स्वतंत्रपणे यु.जी.सी.च्या नियमानुसार सदर दोन अभ्यास मंडळाचे आपण गठण केलेले आहे. विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणा-बरोबरच पदवी व पदव्युत्तर वर्गाचा अभ्यासक्रमामध्ये प्रामुख्याने सर्टीफिकेट कोर्सेस, प्रोजेक्टस, स्कील डेव्हलपमेंट कोर्सेसचा अंतर्भाव केलेला आहे. महाविद्यालयामध्ये एकूण ६५ सर्टीफिकेट कोर्सेस विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध आहेत. प्रत्येक सर्टीफिकेट कोर्सला २ क्रेडीटस, स्कील डेव्हलपमेंट कोर्सला २ क्रेडीटस व पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षामध्ये ४ क्रेडीटसचा प्रोजेक्ट पूर्ण करणे अनिवार्य केले आहे. यामुळे निश्चितच विद्यार्थ्यांच्या

गुणवत्तेमध्ये वाढ केलेली दिसत आहे.

तसेच पुणे विद्यापीठ व इतर विद्यापीठांचे निकाल अजून जाहीर झालेले नाहीत. परंतु आपण वेळेत परीक्षा घेवून निकाल जाहीर केल्याने आपल्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाल्या.

| | |
|---|---|
| बी. ए. पदवीसाठी | ५ सीसी + २ प्रोजेक्ट्स |
| बी. कॉम. पदवीसाठी | ६ सीसी + १ प्रोजेक्ट |
| बी. एस्सी. पदवीसाठी | ६ सीसी + १ प्रोजेक्ट |
| बीबीए पदवीसाठी | ५ सीसी + १ प्रोजेक्ट |
| बीबीए सीए पदवीसाठी | ३ सीसी + १ प्रोजेक्ट |
| एम. ए. पदवीसाठी | २ सीसी + १ प्रोजेक्ट + २ स्किल डेव्हलपमेंट कोर्स |
| एम. कॉम. पदवीसाठी | ३ सीसी + १ प्रोजेक्ट + २ स्किल डेव्हलपमेंट कोर्स |
| एम. एस्सी. | ३ सीसी + १ प्रोजेक्ट + २ स्किल डेव्हलपमेंट कोर्स |
| एम. लिब. | २ सीसी + १ प्रोजेक्ट |

अशा पध्दतीने कालानुरूप अभ्यासक्रमात आपण बदल केलेला आहे. आपणाकडे सध्या बॉटनी, मायक्रोबायोलॉजी व फिजिक्स विषयांत रिसर्च सेंटर्स असून लवकरच आपणांस मराठी, इंग्रजी व अर्थशास्त्र या ३ विषयांच्या मान्यतेचे पत्र विद्यापीठाकडून अपेक्षित आहे. तसेच ३० सप्टें. २०२१ पूर्वी आपण आणखी काही विषयांच्या रिसर्च सेंटरसाठी प्रस्ताव दाखल करणार आहोत अशी माहिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सभेस दिली. सभेने त्याची नोंद घेतली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ३ –

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शै. वर्ष २०२०-२१ मध्ये पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमांची व परीक्षांची माहिती घेणे.

ठराव नं. ३ –

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शै. वर्ष २०२०-२१ मध्ये पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमांची व परिक्षांची सविस्तर माहिती मा. उपप्राचार्य व मा. परीक्षा अधिकारी डॉ. जगदीश देशपांडे यांनी खालीलप्रमाणे सभेस दिली.

१. ३ मार्च २०२० ते १४ मार्च २०२० या कालावधीत बॅकलॉगच्या परिक्षा पूर्ण झाल्या. मात्र १७ मार्च २०२० पासून लॉकडाउन चालू झाल्या कारणाने पुढच्या परिक्षा होवू शकल्या नाहीत. त्यानंतर विद्यापीठाने पाठविलेल्या पत्रानुसार एका ठराविक सुत्राद्वारे विद्यार्थ्यांना मार्क देण्यात आले.

२. सन २०२०-२१ च्या रेग्युलर टर्मस् ऑगस्ट / सप्टेंबर पासून सुरु झाल्या. अभ्यासक्रम डिसेंबर पर्यंत पूर्ण झाल्यानंतर प्रथम, तृतीय सत्राच्या परिक्षा जानेवारी / फेब्रुवारी २०२१ मध्ये घेण्यात आल्या. त्याचा निकाल महिन्याभरात लावला तो निकाल सरासरी ८५% होता.

३. सन २०२०-२१ च्या रेग्युलर टर्मस् फेब्रुवारी पासून सुरु झाल्या. त्याचा अभ्यासक्रम मे पर्यंत पूर्ण झाल्यानंतर बॅकलॉग व रेग्युलरच्या परीक्षा जून २०२१ मध्ये घेण्यात आल्या व त्याचा निकाल १५ ऑगस्ट २०२१ पर्यंत लावला. तो निकाल सरासरी ८२% होता.

४. सन २०२१-२२ च्या रेग्युलर टर्मस् ऑगस्ट पासून सुरु झाल्या आहेत. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नोव्हेंबर-२०२१ च्या अखेरीस परीक्षा घेण्याचे ठरविलेले आहे.

या सर्व बाबींची माहिती सभेने घेतली व समाधान व्यक्त केले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ४ –

शै. वर्ष २०२१-२२ साठी केलेल्या शैक्षणिक नियोजनाची माहिती घेणे.

ठराव नं. ४ –

कोरोनामुळे मागील वर्षी पदव्युत्तर प्रथम वर्षाचे वर्ग जानेवारी २१ मध्ये सुरु झाले. सध्या या वर्गाची द्वितीय सत्राची परीक्षा या महिनाअखेर पूर्ण होईल व ऑक्टोबर मध्ये त्यांची द्वितीय वर्षाचे प्रवेश सुरु होतील. यावर्षी देखील महाविद्यालयाचे प्रॉस्पेक्टस आपण आपल्या वेबसाईटवर अपलोड केलेल्या आहेत

एस. वाय. व टी. वाय. पदवीचे वर्ग १ ऑगस्ट २०२१ पासून सुरु झालेले असून प्रथम वर्गाचे तास १ सप्टेंबर पासून सुरु झाले आहेत. पहिल्या आठवड्यात प्राध्यापकांनी ब्रीज कोर्स चा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे.

सी. आर. ए. आर. (सेंटर फॉर इनोव्हेटीव्ह ॲण्ड ॲप्लाईड रिसर्च) च्या माध्यमातून इंटरडिपार्टमेंटल ॲण्ड इंटरडिसिप्लीनरी रिसर्च प्रोजेक्ट्स विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी यावर्षी उपलब्ध करून देत आहेत. तसेच दि. ०५/०९/२०२१ रोजी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर महाराष्ट्र सिनिअर फेडरेशन च्या हिमाचल प्रदेशामध्ये कुलू या ठिकाणी होणाऱ्या कॉर्फबॉल स्पर्धेची चाचणी झाली. यासाठी आपल्या महाविद्यालयाच्या ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

डिसेंबर २०२१ मध्ये जिमखाना विभागामार्फत इंटरनॅशनल कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात येणार आहेत.

दि. ०८ व ०९ ऑक्टोबर २०२१ रोजी मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ५ –

शै. वर्ष २०२०-२१ या वर्षाच्या ए.क्यू.ए.आर. ला मान्यता देणे.

ठराव नं. ५ –

शै. वर्ष २०१९-२० चा ए.क्यू.ए.आर. नॅकला अपलोड केला आहे. शै. वर्ष २०२०-२१ चा ए.क्यू.ए.आर लिंक ओपन झाल्यानंतर आपण नॅकच्या साईटला अपलोड करणार आहोत अशी माहिती डॉ. योगिनी गुडे आय.क्यू.ए.सी. कॉ-ऑर्डीनेटर यांनी सांगितली. सभेने याची नोंद घेतली व शै. वर्ष २०२०-२१ चा ए.क्यू.ए.आर. अपलोड करणेस मान्यता दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ६ –

आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये रुसांतर्गत झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

ठराव नं. ६ –

डॉ. अजित तेलवे यांनी रुसांतर्गत झालेला खर्चाचा सविस्तर तपशील सभेपुढे सांगितला.

स्वायत्ततेअंतर्गत महाविद्यालयास रुसाकडून ५ कोटी अनुदान मंजूर झाले आहे. पैकी हार्ड कंपोनंट करिताची १,५५,४२,४४३/- रक्कम खर्च होवून आजपर्यंतचे ऑडीट होवून युटिलायझेशन देखील रुसाला दिलेल्या तपशीलानुसार आपण खर्च करून रुसाकडे क्लेम करायचा आहे. अशी माहिती मा. उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे यांनी सभेस दिली व सभेने त्याची नोंद घेतली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय नं. ७ –

२०२१-२२ मध्ये रुसाच्या सुधारीत नियमावलीनुसार विविध उपक्रमांचे आयोजन करणेस परवानगी देणे.

ठराव नं. ७ –

२०२१-२२ मध्ये रुसाच्या सुधारीत नियमावलीनुसार विविध उपक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती डॉ. अजित तेलवे यांनी सभेस दिली. सदरच्या आयोजनास ही सभा आपली परवानगी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय –

सहकार्य करार व त्यांची अंमलबजावणी याबाबत माहिती घेणे.

ठराव नं. ८ –

आपले महाविद्यालयाने आतापर्यंत एकूण ३१ संस्थांशी करार केलेले आहेत. या करारांचा विद्यार्थ्यांना फायदा होतो आहे. केंब्रीज युनिर्व्हसिटी, पेडेगा भारत, पुणे यांच्याशी झालेल्या करारांतर्गत एकूण १४०० विद्यार्थ्यांना लाभ झाला. तसेच वहाई ॲकॅडेमी यांच्येशी झालेल्या करारअंतर्गत व्हॅल्यू एज्युकेशन चा कोर्स, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारि, विद्यार्थी यांनी पूर्ण केला आहे. निश्चितच याचा फायदा या सर्वांना झाला असल्याची माहिती मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ९ -

मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

विषय क्र. ९.१ -

अनुदानित तासिका तत्वावर प्राध्यापक पदभरतीबाबत माहिती घेणे.

ठराव नं. ९.१ -

मा. सहसंचालक, पुणे यांचेकडून अनुदानित तासिका तत्वावर भरावयाच्या खालील पदांना मान्यता मिळाली असून सदर पदांकरिता दि. १३ सप्टेंबर २०२१ रोजी मुलाखती आयोजित केल्या असल्याची माहिती मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी सभेस दिली. सभेने त्याची नोंद घेतली.

| | |
|---|---|
| १) इंग्रजी - ०३ पदे | ९) फिजिक्स - ४ पदे |
| २) डिफेन्स स्टडीज - ०४ पदे | १०) केमिस्ट्री - २ पदे |
| ३) जिऑग्राफी - ०१ पद | ११) स्टॅटिस्टिक्स - १ पदे |
| ४) सायकॉलॉजी - ०२ पदे | १२) बॉटनी - २ पदे |
| ५) सोशलॉजी - ०१ पद | १३) झुलॉजी - १२ पदे |
| ६) इकॉनॉमिक्स - ०२ पदे | १४) इलेक्ट्रॉनिक्स - १ पद |
| ७) पॉलिटिक्स - ०१ पद | १५) मायक्रोबायॉलॉजी - ३ पदे |
| ८) कॉमर्स - ०६ पदे | |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ९.२ -

माजी विद्यार्थी संघटनेचे पुनर्जीवन करणेबाबत.

ठराव नं. ९.२ -

आपल्या महाविद्यालयातील रजिस्टर्ड असलेल्या माजी विद्यार्थी संघटनेचे पुनर्जीवन करण्यास गरजेचे सभेने आपली मान्यता दिली.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय नं. ९.३ -

भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षानिमित्त अनेक उपक्रम आयोजित केले आहेत त्याबाबत.

ठराव नं. ९.३ -

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त वर्षभर खालीलप्रमाणे अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. अविनाश जगताप यांनी सभेस दिली.

१) ७५ वृक्ष लागवड चिंचवनाची उभारणी
२) ७५ मान्यवरांची व्याख्याने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन
३) ७५ वीरगती प्राप्त झालेल्या सैनिकांच्या वीरपत्नींचा सत्कार.
४) ७५ 'बी' व 'सी' प्रमाणपत्र प्राप्त छात्र सैनिकांचा अभ्यास
५) ७५ विनाअनुदानित प्राध्यापकांना शोधनिबंध प्रसिद्ध करण्यासाठी अनुदान
६) ७५ विनाअनुदानित विद्यार्थ्यांना शोधनिबंध प्रसिद्ध करण्यासाठी अनुदान.
७) ७५ महाविद्यालयातर्फे शोधनिबंधांचे प्रकाशन
८) ७५ दुर्मिळ औषधी वनस्पती लागवड
९) ७५ वृक्ष लागवड देवराई निर्मिती जळगाव सुपे
१०) ७५ समाज प्रबोधनाचे पथनाट्य प्रयोग
११) ७५ बाटल्यांचे रक्तदान संकलन
१२) ७५ कोविड योद्ध्यांचा सन्मान
१३) ७५ अस्मिता भित्तीपत्रकात 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या विषयावर लेखन प्रसिद्ध करणे.
१४) ७५ भारतीय कवी / साहित्यिकांचे प्रदर्शन
१५) ७५ अनेकान्त वार्षिक अंकात अमृत महोत्सव विषयावर लेखन.

असे अनेकविध उपक्रम महाविद्यालयामार्फत व विभागामार्फत राबविले जाणार आहेत. याची सुरुवात म्हणून नं. १ चा उपक्रम वृक्ष लागवड चिंचवनाची उभारणी दि. ५ सप्टेंबर २०२१ रोजी कासुर्डी येथे करण्यात आली. सभेने याबाबत माहिती घेतली व या उपक्रमांस शुभेच्छा दिल्या.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ९.४ –

प्रोफेसर इमेरिटस चे पद निर्माण करणे व व्हिजिटींग फॅकल्टी वर मान्यवरांची नेमणूक करणे.

ठराव नं. ९.४ –

महाविद्यालयास स्वायत्तता दर्जा प्राप्त झाला आहे. संशोधनामध्ये गुणवत्ता राखण्यासाठी जेष्ठ, मान्यवर तज्ञांची नियुक्ती जर संशोधन केंद्रावर केली तर निश्चितच मोठा लाभ होवू शकेल. त्यासाठी 'प्रोफेसर इमेरिटस' चे पद निर्माण करुन व्हिजिटींग फॅकल्टी वर मान्यवरांची नेमणूक करणेस सभा आपली मान्यता देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय विचारार्थ नसल्याने मा. उपप्राचार्या डॉ. सीमा-नाईक गोसावी यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपल्याचे घोषित केले.

अध्यक्ष

प्राचार्य

प्राचार्य. वाचून मंजूर

अध्यक्ष.